जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 SEP 2018
Times of India

# SUK youth festival from September 29

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The district-level round of youth festival for colleges affiliated to the Shivaji University Kolhapur (SUK) will commence from September 29 at city-based Mahavir College.

SUK's student welfare officer R V Gurav told **TOI** that students from over 200 colleges across Sangli, Satara and Kolhapur districts will be part of the youth festival that encourages extra-curricular activities among students.

"The event will be conducted in over 20 different categories, for the participants. Events such as folk dance, classical singing, classical dance, one act play, debates, group song and folk orchestra among others will be organised. All the events will be held in individual as well as group categories," he added.

Notably, according to the official, last year over 2,000 students were part of the youth festivals and the university is better response for this year.

Being asked about the venues of the festival, Gurav said, "The festival will kick-off from September 29 for Kolhapur district at Mahavir College, while DP Bhosale College Koregaon in Satara district will host the youth festival on October 1. On October 3, Shrimant Babasaheb Deshmukh College in Sangli district will host the festival."

After completing the district level rounds the winners will advance to the central youth festival scheduled at Willingdon College in Sangli from October 5 to 7.

According to the official, the winners from the central youth festival will get a chance to represent Shivaji University at the inter-university youth festival Indradhanush later in the month of November.

पुढारी

# माजी 'राजारामियन्स'चा पर्यावरणपूरक उपक्रम 'ऑक्सिजन पार्क' पहिला टप्पा पूर्ण

**कोल्हापूर** : 'संस्थानकालीन' राजाराम महाविद्यालयात ५५० वृक्षांचे रोपण करण्यात आले. तब्बल १३८ वर्षांची परंपरा असणाऱ्या महाविद्यालयात 'ऑक्सिजन पार्क' चा पहिला टप्पा यामुळे पूर्णत्वाकडे गेला आहे.

गेली ३ ते ४ महिने माजी राजारामियन्सनी परिश्रम घेऊन महाविद्यालयाच्या विस्तीर्ण जागेवर विविध प्रकारच्या जातींचे वृक्षारोपण करण्यात आले. त्यामध्ये पिंपळ, वड, उंबर, बहावा, सोनचाफा, निळमोहर, गुलमोहर, गुळभेंडी, जांभूळ, पळस, चिंच, नारळ, क रंजी, आंबा, सीताफळ, कशिद, कांचन, आपटा इत्यादी वृक्षांचा समावेश आहे. तसेच शोभेची झाडेही लावण्यात आली आहेत.

वरील वृक्षांचे संगोपन व संवर्धनासाठी दुसऱ्या टप्प्याचे नियोजन करण्यात आले आहे. खासदार छ. संभाजीराजे, विशेष पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील, प्राचार्य खेमनार व टोलविरोधी कृती समितीचे निमंत्रक निवासराव साळोखे या मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते. हा उपक्रम २००१ पासून सुरू करण्यात आला. महाविद्यालयात सध्या शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी म्हणून काही माजी महाविद्यालयात राजारामियन्सचा गौरव सोहळा घेण्यात आला. त्यामध्ये खासदार छ. संभाजीराजे, आय.टी.सी.चे. कुलगुरू पद्मश्री.जी.डी.यादव व विशेष पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील यांचा गौरव करण्यात आला. तसेच रस्त्यावरील फिरस्त्यांना चादरी व ब्लँकेटस्‌चे वाटप करण्यात आले. त्याचबरोबर शिये येथील कल्याणत विशेष आश्रमातील मुलांना धान्य व शालेय साहित्यांचे वाटप करण्यात



कोल्हापूर : महाविद्यालयात ऑक्सिजन पार्कसाठी वृक्षारोपण करताना खा. संभाजीराजे, विश्वास नांगरे-पाटील, निवासराव साळोखे आदी.

आले.सध्या भेडसावत असणाऱ्या ग्लोबल वार्मिंग समस्यांच्या तसेच प्रदूषणामुळे मानवावर होणाऱ्या परिणामातून बाहेर पडण्याकरिता 'फुल ना फुलाची पाकळी' या विचारातून 'ऑक्सिजन पार्क'चे नियोजन करण्यात आले.

या उपक्रमासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रत्नागिरीचे पोलिस उपअधीक्षक सतीश गुरव, टोल समितीचे निमंत्रण निवास साळोखे, प्रकाश पाटील, डॉ. संजय पाटील, धीरज पाटील (सडोलीकर), सुरजित पवार, मॉडर्न होमिओपॅथीचे डॉ. विजयकुमार माने, नगरसेवक अफजल पिरजादे व भूपाल शेटे, सुभाष माने, आशिष कोरगावकर, अमोल कुलकर्णी यांनी झाडे, माती तसेच इंधन व पोकलँड देऊन सहकार्य केले. यावेळी विविध क्षेत्रांत कार्यरत असणारे माजी विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 8 SEP 2018
तरुण भारत



कळे : आनंदी विद्यालयात डॉ. डी. आर. मोरे सत्कार प्रसंगी संस्थापक सतिश देसाई.

# गुणवत्तापूर्ण शिक्षणाची गरज : डॉ. मोरे

वार्ताहर
कळे

आनंदी शिक्षण प्रसारक मंडळ, कळंबे तर्फे कळे चा १२ वा वर्धापनदिन उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे प्रमुख पाहुणे होते.

डॉ. डी. आर. मोरे यांनी बोलताना गुणवत्तापूर्ण शिक्षण व शिक्षकच सक्षम विद्यार्थी घडवू शकतात मनोगत व्यक्त केले, तर आर्किटेक्ट निशिकांत गोरुले यांनी आनंदी शिक्षण प्रसारक मंडळाने १२ वर्षांत डी.एड, इंग्लिश मेडीयम, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय ते फार्मसी महाविद्यालयापर्यंत झेप घेतल्याबद्दल अभिनंदन केले.

या वेळी वर्धापनदिनानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण करण्यात आले. प्रास्ताविक संस्थेच्या सचिव डॉ. विद्या देसाई यांनी केले. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्रा. सतीश देसाई होते. या प्रसंगी विद्यार्थी सई मिसाळ, सौ. कारंडे, सौ. परिट, प्रा. ए. एस. कांबळे,प्रा. डॉ. एस.एस. पानारी, प्राचार्य आर.एस. आडनाईक, प्राचार्य डॉ. एन. व्ही. शहा आदींनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा.डी.बी. भोसले यांनी तर आभार प्रा. कांबळे यांनी मानले.

**आनंदी शिक्षण प्रसारक मंडळाचा १२वा वर्धापनदिन उत्साहात साजरा**